दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com


● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● शनिवार दि.३० ऑगस्ट २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक १५ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Saturday 29 August 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 15 ● Pages 4 ● Rate 4 Rs

# मनोज जरांगे पाटलांची मुंबईत सरकारवर तोफ

## हे सरकार इंग्रजांपेक्षाही वाईट, मुख्यमंत्र्यांना आमच्या वेदना कळत नाहीत

**मुंबई (वृत्तसंस्था)-मनोज जरांगे पाटील यांचे मुंबईत आंदोलन सुरू असून आणखी एक दिवसाची परवानगी देण्यात आली आहे. राज्यभरातून लाखो मराठे मुंबईत दाखल झाले आहेत. मनोज जरांगे पाटलांच्या उपोषणाला आज सायंकाळी ६ पर्यंतची वेळ होती. परंतु आणखी एक दिवसाची मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर मनोज जरांगे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना तूफान फटकेबाजी केली.मनोज जरांगे म्हणाले, इंग्रजा पेक्षा हे सरकार बेकार. सरकारने भंगार खेळ खेळणे बंद करा, असली खेळ खेळा. सरकारने जेवण आणि पाणी मिळू दिले नाही. सरकार आडमुठे गेले तर मराठे आडमुठे घुसणार. एक एक दिवसाची रडक्यासारखी परवानगी दिली. तुम्ही आमच्या जिल्ह्यात आल्यावर अशी वागणूक देतो का? तुम्ही आम्हाला मुंबईत अशी वागणूक दिली न फडणवीस साहेब तर आमच्याकडे आल्यावर आम्ही पण तुम्हाला त्रास देणार. कशाला त्या लफड्यात पडता?**



पुढे बोलताना मनोज जरांगे म्हणाले, तुमचे खरे आणि आमचे खरे नाही, असे कसे होऊ शकते? आमचे मराठ्याचे पोरं चावतेत का रस्त्याने चालताना? तुमच्या दारात आलो तर एक एक दिवसाची परवानगी देता, काय राव? २७ तारखेला सकाळी पण जेवलो नाही, तसाच पुढे निघालो. २८ ला सकाळी जेवलो ते पण थोडेच जेवलो आणि त्यात मी जागाच होतो. मला हे सरकारला सांगायचे आहे की मराठ्यांच्या पोरांशी वाईट वागू नका, गरिबाचे लेकरे आहेत ते. आमचे लोक माज घेऊन नाही आले इकडे. आमच्या पोरांचे खूप हाल आहेत, तुम्हाला नाही कळणार मुख्यमंत्री साहेब. तुम्हाला आमचे वेदना कळत नाही.मी बलिदान द्यायला तयारच झालो आहे, पण तुम्ही आमच्या मराठ्यांच्या पोरांसाठी दुकाने बंद करू नका. नाहीतर जशास तसे होणार. पोरांनो तुम्ही कुठेही गेले तरी संयम पाळा. आपापल्या गाड्या व्यवस्थित मैदानावर जाऊन लावा. तिथून इथे मैदानात येता येईल. चेंबूरच्या मैदानावर गाड्या लावा. पार्किंगची जबाबदारी



सरकारची आहे. सरकारने नाही ऐकले तर आणखी खूप मोठ्या संख्येने मराठे मुंबईत येणार आहेत. मी खोटे सांगत नाही. तुम्ही जेवढा विलंब कराल तेवढे मराठे मुंबईमध्ये येत राहणार. आम्ही लोकशाहीचा आणि शांततेचा मार्ग सोडणार नाही. तुम्ही गोळ्या घातल्या तरी मी त्याला तयार आहे, तुम्ही जे कराल त्यासाठी मी तयार आहे. माझ्या मागण्या तुम्हाला माहीत आहे, आता पुन्हा सांगणार नाही.मनोज जरांगे पाटील पत्रकारांच्या प्रश्नांचे उत्तर देताना म्हणाले, या सरकारला मराठ्यांच्या पोरांचे भले होऊ द्यायचे नाही. त्यांना मराठा समाजाचे वाटोळे करायचे आहे म्हणून कोणी चर्चेला आले नाही. एक दिवसाची परवानगी देऊ शकतात तर कायमस्वरूपी परवानगी सरकार देऊ शकते. सरकार असून खूप चुकीचे करत आहेत. त्यांनी गैरसमज पसरवण्याचे काम केले आहे. एकाचे काढून दुसऱ्याला आम्ही मागतच नाही, हे सरकारचे काम आहे. आमच्या जुन्या नोंदी आहेत.ओबीसी १६ टक्के आरक्षण खातात. ओबीसीला ३२ टक्के त्यातले २० टक्के कमी करा आणि आम्हाला द्या असे आम्ही म्हणालो का? आमच्या नोंदी आहेत त्यातले आरक्षण मागत आहोत. आता महाराष्ट्राला सगळे कळले आहे. आपल्या सरकारी नोंदी आहेत, आपण कोणाचे घेत नाही. हे ओबीसी लोकांना पण माहीत आहे, काही लोक सोडले तर. आता फायनल फाईट होणार. आरक्षण होणार नाहीतर मी तरी उपोषण करून मरणार. त्यांच्या आडमुठेपणामुळे केंद्र सरकारलाही दाग लागणार आहे, असेही जरांगे म्हणाले.

# ३१ ऑगस्ट भटके-विमुक्त दिनानिमित्त बीड जिल्ह्यात पूर्वतयारी बैठक उत्साहात

**बीड । बालाजी जगतकर**

महाराष्ट्र शासनाने ३१ ऑगस्ट हा दिवस भटके-विमुक्त दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला असून, याचे भटके-विमुक्त बांधवांकडून उत्साहात स्वागत करण्यात येत आहे. या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी बीड जिल्ह्यात भटके विमुक्त विकास परिषदेच्या माध्यमातून एका पूर्वतयारी बैठकीचे आयोजन करण्यात आले.



या बैठकीला भटके-विमुक्त विकास परिषदेचे देवगिरी प्रांत संयोजक उमेश जोगी, डॉ. सुभाष जोशी, महंत दत्ता महाराज गिरी, भटके-विमुक्त मित्र मंडळाचे बालाजी पवार, डॉ. कैलास पैठणकर, अतुल घोरड, जिल्हा संयोजक ओमप्रकाश गिरी, अक्षय तट, संध्या राजपूत, प्रीत कुकडेजा, राजेंद्र बन , जिल्हा अभियान प्रमुख बबन गिरी, भगवान पवार, बाजीराव गिरी, अनघा प्रकाश, उत्तम गायकवाड, नेहा माळी यांच्यासह परिषदेचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.बैठकीत ३१ ऑगस्ट रोजी भटके-विमुक्त दिन मोठ्या प्रमाणात साजरा करण्यासाठी पूर्वनियोजन करण्यात आले. शासनाच्या विविध विभागांमार्फत भटके-विमुक्त समाजासाठी उपलब्ध असलेल्या योजनांची माहिती देण्याचे नियोजन करण्यात आले. तसेच, आधार कार्ड, रेशन कार्ड, मतदान कार्ड आणि जात प्रमाणपत्र यांसारख्या मूलभूत सुविधा अविरतपणे उपलब्ध करून देण्यासाठी ठोस पावले उचलण्याचा निर्णय घेण्यात आला.भटके-विमुक्त समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांच्या हक्कांसाठी ही बैठक महत्त्वपूर्ण ठरली असून, येत्या ३१ ऑगस्ट रोजी होणाऱ्या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन परिषदेतर्फे करण्यात आले आहे. बैठकीचे संचालन ओमप्रकाश गिरी तर आभार प्रदर्शन कुलकर्णी काका यांनी केले.

# आहेर धानोरा येथे महिलाचे उभी बाटली आडवी करून आंदोलन-आम्रपाली साबळे

## महिला सरपंच मोनिका इंगोले सह अनेक महिलांचा सहभाग

**बीड । प्रतिनिधी**

आहेर धानोरा ता.जि.बीड येथील दि.२८ ऑगस्ट रोजी अन्याय अत्याचार भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या जिल्हाध्यक्ष आम्रपाली साबळे व टायगर ग्रुपच्या सारिका गायकवाड, सरपंच मोनिका इंगोले , कावेरी खेमाडे, छायाताई सह महिलांनी एकत्र येऊन गावात साधारणतः नऊ ठिकाणा वरून देशी दारू, हातभट्टी व चोरून विदेशी दारू मोठ्या प्रमाणात विक्री केली जाते, पोलीस व दारूबंदी प्रशासनाच्या लोकांना निवेदने देण्यात आले. त्यामुळे व्यसनाधीन तरुण व पुरुषांचे प्रमाण गावांमध्ये वाढले आहे. या मुळे गावातील पुरूष वर्ग तसेच विद्यार्थी ही दारूमुळे व्यसनाच्या मोठ्या प्रमाणावर बळी पडत आहेत. त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. त्याचप्रमाणे हा पुरुषवर्ग दारूचे सेवन



केल्यानंतर घरी गेल्यावर घरातील महिलांबरोबर वाद, तंटे करत आहेत. या गावातील दारूमुळे व्यसनी झालेल्या लोकांमुळे शाळेत येणाऱ्या-जाणाऱ्या विद्यार्थीना मोठ्या प्रमाणावर अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यांची कुचंबना होत आहे. त्यामुळे काही विद्यार्थीनी शाळा सोडल्या आहेत. गावातील दारूच्या समस्येमुळे गावातील सर्व महिलांची एकत्र येऊन उभी बाटली आडवी आंदोलन केले. गावातील दारूची उभी बाटली आडवी करण्यासाठी महिलांचे मतदान घेण्यात यावे व त्यातून दारूची उभी असलेली बाटली आडवी करून महिलांनी यात सक्रिय सहभाग नोंदवला. यामध्ये आहेर धानोरा येथील संपूर्ण महिला एकवटल्या होत्या.

# भरपावसात खा.बजरंग सोनवणे मनोज जरांगे यांच्या भेटीला

## मराठा आरक्षणला दिला जाहीर पाठिंबा पाठिंबा देणारे राज्यातील पहिले लोकप्रतिनिधी



**मुंबई । प्रतिनिधी**

मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील आज आझाद मैदानावर उपोषणाला बसले आहेत. यावेळी भर पावसात खा.बजरंग सोनवणे यांनी मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. यावेळी मराठा आरक्षण लढ्याला जाहीर पाठिंबा दिला. आपण दादासोबत आहोत, अशी प्रतिक्रिया देखील त्यांनी यावेळी माध्यमाना दिली. मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात मुंबईत मराठा आरक्षण आंदोलन सुरु झालं आहे. दोन दिवसांपासून राज्यातील मराठा आंदोलक मुंबईत दाखल झाले आहेत. दि.२९ रोजी आझाद मैदानात मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सुरू झाले आहे. दरम्यान सकाळ पासून जोरदार पाऊस सुरू आहे. परंतु पडत्या पावसात मराठा समाज रस्त्यावर आहे. खा.बजरंग सोनवणे यांनी देखील पडत्या पावसात आझाद मैदानात जाऊन मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी जरांगे पाटील यांनी केलेल्या सर्व मागण्या सरकारने मान्य कराव्यात अशी मागणी देखील केली. खा.बजरंग सोनवणे यांनी सर्वात पहिली भेट दिली. बजरंग सोनवणे मैदानात येताच मराठा समाजाने त्यांचे प्रचंड जल्लोषात त्यांचे स्वागत केले. आंदोलनाला राज्यातील भेट देणारे पहिले लोकप्रतिनिधी ठरले आहेत. खासदार बजरंग सोनवणे यांनी उघड भूमिका घेतली असून जरांगे पाटील यांनी मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या सर्व मागण्या मान्य कराव्यात अशी मागणी केली

# केज तालुक्यात अनोळखी प्रेत आले आढळून;घात कि अपघात चर्चेला उधान

**केज । गौतम बचुटे**

केज तालुक्यातील जिवाची वाडी शिवारात एक पुरुष जातीचे अनोळखी प्रेत आढळून आले आहे. दि. २९ ऑगस्ट रोजी सायंकाळी केज तालुक्यातील जिवाचीवाडी येथील शिवारात एक अनोळखी पुरुष जातीचे प्रेत जिवाची वाडी तलावापासून चिखलबीडकडे जात असलेल्या रस्त्याच्या कडेला असल्याची माहिती सरपंचांनी केज पोलिसांना दिली. माहिती पोलिसांना मिळताच स्वतः पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे पोलिस उपनिरीक्षक उमेश निकम, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक सोनवणे, पोलिस नाईक चंद्रकांत काळकुटे, वाहनचालक सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक शंभुदेव दराडे हे यांनी घटनास्थळी जाऊन सदर प्रेत केज येथील उपजिल्हा रुग्णालय येथे उत्तरीय तपासणी व शवविच्छेदनासाठी आणले आहे. यामुळे नागरिकांत उलटसुलट चर्चेला उधाण आले असून हा घात की अपघात असावा ! हे प्रेताची ओळख पटल्या नंतर सर्व उलगडा होईल. दरम्यान पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली या अनोळखी प्रेताची ओळख पटविण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.

तसेच या बाबत कुणाला काही माहिती असेल ते त्यांनी केज पोलीस किंवा जवळच्या पोलिस ठाण्यात संपर्क साधण्याचे आवाहन पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांनी केले आहे.

# वडाळी मध्ये गुटख्याची सर्रास अवैध तस्करी

## शाळकरी मुलांचे आरोग्य धोक्यात; कारवाईची मागणी

**वडाळी । लाला चव्हाण**

शहादा तालुक्यातील वडाळी गुटख्याची अवैध तस्करी सर्रासपणे सुरू असून ती दिवसेंदिवस वाढतच आहे. त्यामुळे शाळकरी मुलांपासून तरुणांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहे. गुटख्यामुळे कॅन्सरचे वाढते प्रमाण चिंतेचा विषय ठरत असताना देखील, याकडे पोलीस प्रशासन व अन्न व औषध विभाग पूर्णतः दुर्लक्ष करत असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांमध्ये उमटत आहे.मध्य प्रदेशातून महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर गुटख्याची वाहतूक सकाळच्या व रात्रीच्या सुमारास केली जात आहे. पूर्णाड खेतीया ही वाहने जाऊदा असलोद मंदाना , जयनगर



वडाळी बामखेडा तोरखेडा. हिंगणी अशा विविध मार्गांनी पुढे रवाना होत असल्याची माहिती स्थानिक सूत्रांनी दिली आहे. विशेष म्हणजे ही वाहने शहरातून बिनधास्त जात असून, यामध्ये स्थानिक पोलिसांच्या संगनमताचा संशय नागरिक व्यक्त करत आहेत. मांजरच दूध पित आहे अशी खोचक टीका नागरिकांमधून होत आहे. अन्न व औषध प्रशासनही झोपेचे सोंग घेत असल्याचे चित्र आहे. वडाळी शहादा तालुक्यातील गुटख्याचे रॅकेट मोठ्या प्रमाणात कार्यरत असून, संपूर्ण तालुक्याला याच रॅकेटमधून गुटखा पुरवला जात आहे. त्यामध्ये शाळकरी मुलांचादेखील समावेश दिसून येत आहे. ज्यामुळे भविष्यात आरोग्य संकट ओढावण्याची भिती सुज्ञ नागरिकांनी व्यक्त केली आहे. नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही अद्याप पर्यंत ठोस कारवाई झाली नसल्यामुळे नाराजी वाढत आहे. पोलिस प्रशासन आणि अन्न व औषध विभाग याकडे गांभीर्याने लक्ष देणार का? की पुन्हा एखादी मोठी घटना घडल्याशिवाय प्रशासन जागे होणार नाही, असा प्रश्न सध्या उपस्थित केला जात

संपादकीय

# बदल घडवणारी पूजा



पूजा आठवीतील वर्गात शिकत असताना शाळेशेजारी धान्य मळणीचं काम सुरू होतं. या मळणी यंत्रातून धान्याचा भुसा उडायचा. हवेसोबत हे भुशाचे कण वर्गात यायचे. त्यामुळे मुलांना खोकला येत असे. शेती क्षेत्रात धान्य मळणीचे यंत्र सर्रास वापरले जाणारे यंत्र आहे. पण हे यंत्र आरोग्यास धोकादायक देखील आहे. ग्रामीण भारतात, या धुळीच्या संपर्कात आल्याने दीर्घकालीन खोकला, श्वसनाचे त्रास, ॲलर्जी आणि श्वसन संक्रमण होऊ शकते. विशेषतः लहान मुले आणि शेतमजुरांमध्ये याचे प्रमाण जास्त आढळते. पूजाने ही बाब हेरली. या धुळीपासून रक्षण करण्यासाठी तिने एक यंत्र विकसित केले. या अभिनव प्रयोगामुळे तिने जपानमध्ये पार पडलेल्या विज्ञान प्रदर्शनात भारताचे प्रतिनिधीत्व केले. तालुक्याच्या ठिकाणी सुद्धा न गेलेल्या पूजाचा हा प्रवास प्रेरणादायी आहे.

उत्तर प्रदेशातील बाराबंकी जिल्ह्यातील सिरौली गौसपूर तहसील भागातील अगेहरा या छोट्याशा गावात पूजा पाल राहते. पूजा ही कुटुंबातील पाच मुलांपैकी एक आहे. तिचे वडील, पुट्टीलाल, रोजंदारीवर काम करणारे कामगार आहेत आणि तिची आई, सुनीला देवी, गावातील सरकारी शाळेत मध्यान्ह जेवण बनवते. मातीच्या भिंती आणि गवताने साकारलेले छप्पर असं तिचं घर. वर्षानुवर्षे पूजाच्या घरात वीज नव्हती. रॉकेलच्या दिव्यावर ती आणि तिची भावंडे अभ्यास करत असत. तिचे आई-बाबा नेहमी म्हणत 'आम्ही कमी खाऊ, पण तुम्ही सर्वांनी अभ्यास केला पाहिजे. कारण शिक्षणच तुम्हाला पुढे घेऊन जाईल.'आठवी इयत्तेत शिकत असताना पूजाच्या लक्षात आले की, तिच्या शाळेतील मुले जवळच्या मळणी यंत्रातील धुळीमुळे खूप खोकतात. हवा बारीक भुसाच्या कणांनी भरलेली होती जी या मुलांच्या फुफ्फुसांत जाई. हाच त्रास शेत मजुरांनादेखील होत असे. ती धूळ पूजाच्या मनात बसली. तिने स्वतःला विचारले, आपण याबद्दल काही करू शकतो का? यावर काहीतरी तोडगा काढला पाहिजे.काहीतरी कृती करण्याचा निर्धार करून, तिने तिच्या शाळेतील शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आणि एका वेल्डरच्या मदतीने एक मॉडेल यंत्र तयार करण्यास सुरुवात केली. या यंत्राच्या अनेक चाचण्या केल्या. अनेक चुका झाल्या त्या सुधारल्या. असे करत तिने एक धूळमुक्त थ्रेशर तयार केले. एक डब्बा आणि पंखा यांच्या मदतीने उडणारी धूळ एका पाण्याच्या पिशवीमध्ये जमा होत असे. असे हे यंत्र होते. या यंत्रासाठी ३ हजार रुपये खर्च आला. हा खर्च पूजाच्या कुटुंबासाठी फार मोठा होता. गावातील लोक पूजाची थट्टा करायचे. 'तू हे का करत आहेस? तुला काय मिळेल?' असे ते म्हणायचे. पूजाने त्यांच्याकडे दुर्लक्ष करून आपल्या कामावर लक्ष दिले.पूजाचे विज्ञान विषयाचे शिक्षक राजीव श्रीवास्तव यांनी तिला तिचा प्रकल्प इनस्पायर मानक (खछडझखठए - चअछअघ) मध्ये सादर करण्यास मदत केली. भारताच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाने सुरू केलेला, खछडझखठए (इनोव्हेशन इन सायन्स पर्सुइट फॉर इन्स्पायर्ड रिसर्च) हा तरुण वैज्ञानिक मनांना जागृत करण्यासाठी एक राष्ट्रीय कार्यक्रम आहे. इयत्ता सहावी ते दहावीपर्यंतचे विद्यार्थी स्थानिक पातळीवर रुजलेल्या कल्पना सादर करू शकतात जे वास्तविक जगातील समस्या सोडवतात. निवडलेल्यांना मार्गदर्शन आणि प्रोटोटाइप तयार करण्यासाठी अनुदान मिळते, जे नंतर जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर प्रदर्शित केले जातात.२०२३ मध्ये, पूजा पालचा शोध भारतातील हजारो प्रवेशिकांमधून निवडला गेला. ६० राष्ट्रीय विजेत्यांपैकी, ती उत्तर प्रदेशातील एकमेव होती. तिचे धूळमुक्त थ्रेशर मॉडेल २०२४ मध्ये राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनात प्रदर्शित करण्यात आले होते. या यंत्राने त्याच्या कमी किमतीच्या, उच्च-प्रभावाच्या डिझाइनसाठी प्रशंसा मिळवली. विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालय आता तिच्या मॉडेलचे पेटंट घेण्यासाठी काम करत आहे. हा ग्रामीण विद्यार्थ्यासाठी एक दुर्मीळ सन्मान आहे.२०२५ मध्ये पूजाची जपानमधील साकुरा सायन्स हायस्कूल प्रोग्रामसाठी निवड झाली. जपान सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी एजन्सी (जेएसटी)द्वारे हा एक प्रतिष्ठित उपक्रम आहे जो जगभरातील अव्वल विज्ञान विद्यार्थ्यांना एका आठवड्यासाठी एकत्रितपणे शिक्षण आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीसाठी एकत्र आणतो. भारतातील हजारो नामांकित विद्यार्थ्यांपैकी फक्त ५४ विद्यार्थ्यांची निवड झाली. या ठिकाणी सुद्धा पूजा ही उत्तर प्रदेशातील एकमेव विद्यार्थिनी होती.विज्ञान उपक्रमांना उपस्थित राहण्याव्यतिरिक्त, विद्यार्थ्यांना टोकियोच्या सहलीवर देखील नेण्यात आले. पूजासाठी, हा एक अविस्मरणीय अनुभव होता. जपानी माणसांची अदब, पाहुणचार, कमालीचा नम्रपणा तिच्या मनाला भावला.बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर, पूजाला एक छोटासा व्यवसाय सुरू करायचा आहे. या व्यवसायाच्या माध्यमातून तिला तिचा महाविद्यालयीन शिक्षणाचा खर्च स्वतःच उचलायचा आहे. त्याचसोबत आपल्या आई-वडिलांना आर्थिक मदत सुद्धा करायची आहे. पूजा म्हणते की, तिला इतके मोठे व्हायचे आहे की जे लोक एकेकाळी आपल्याला तुच्छ मानत होते त्यांना आपली खरी क्षमता दाखवून द्यायची आहे.आपण कोणत्या परिस्थितीत वाढलो हे महत्त्वाचे नाही तर आपण आपली परिस्थिती बदलण्यासाठी काय प्रयत्न करतो हे महत्त्वाचे आहे. पूजा पालने स्व-कर्तृत्वाने हे सिद्ध केले.

# शहादा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मनमानी कारभारा विरोधात अक्कलकुवा येथे भाजपचे जन आक्रोश आंदोलन

**मोलगी । रविंद्र वळवी**

सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादाचे कार्यकारी अभियंता मयूर वसावे आणि उपविभागीय अभियंता एसव्ही पवार यांच्या भ्रष्ट व मनमानी कारभाराविरोधात भारतीय जनता पक्षाने(भाजपा) अक्कलकुवा येथील उपविभागीय अभियंता कार्यालयाबाहेर बेमुदत जन आक्रोश आंदोलन केले. भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष तथा अक्कलकुवा विधानसभा निवडणूक प्रमुख नागेश पाडवी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात अनेक मागण्या मान्य झाल्याने ते तब्बल सात तासांनंतर स्थगित करण्यात आले. या आंदोलनात माजी जिल्हा परिषद सदस्य किरसिंग वसावे, प्रताप वसावे, नटवर पाडवी, नितेश वळवी, शासकीय ठेकेदार संतोष जैन, दिलीप परदेशी, माजी पंचायत समिती सदस्य सुधीर पाडवी यांच्यासह अनेक प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. आंदोलकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे खालील प्रमुख मागण्या केल्या होत्या: राष्ट्रीय महामार्ग ७५३ब ते शांतीधाम रस्त्याची निविदा उघडणे. राज्य मार्ग ३ (डाब ते इराईबारी) रस्त्याची निविदा उघडणे.



कोन्यापाडा देवीदेव आणि खडकापाणी ते पाडवीपाडा येथील कामांची अनामत रक्कम कंत्राटदारांना परत करणे. आंदोलकांनी आरोप केला की, विकास कामांसाठी टक्केवारी दिल्याशिवाय कामांची देयके अदा केली जात नाहीत, ज्यामुळे भ्रष्टाचाराने कळस गाठला आहे. सकाळी ११ वाजता सुरू झालेले हे आंदोलन संध्याकाळी सहा वाजेपर्यंत चालले. आंदोलनाचे नेतृत्व करणारे नागेश पाडवी, किरसिंग वसावे आणि नितेश वळवी यांनी कार्यकारी अभियंता मयूर वसावे आणि उपअभियंता पवार यांच्या कारभारावर तीव्र शब्दांत प्रतिक्रिया व्यक्त केल्या. सुमारे सात तास चाललेल्या वाटाघाटीनंतर, कार्यकारी अभियंता मयूर वसावे यांनी आंदोलकांच्या मागण्या पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन दिले. त्यानंतरच आंदोलन मागे घेण्यात आले. आंदोलनादरम्यान, माजी आदिवासी विकास मंत्री डॉक्टर विजयकुमार गावित आणि माजी खासदार डॉक्टर हिना गावित यांनी शासन स्तरावर हस्तक्षेप करून मागण्या मान्य करण्यासाठी पाठपुरावा केला, त्यामुळे आंदोलन यशस्वी झाले. याबद्दल आंदोलनकर्त्यांनी त्यांचे आभार मानले.

# द लास्ट बॅटल एकांकिकेची नाट्यपरिषद करंडकच्या अंतिम फेरीसाठी निवड

**बीड । प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद करंडक या राज्यस्तरीय एकांकिकेत स्पर्धेतील प्राथमिक फेरीमध्ये, सौ.के.एस.के.महाविद्यालय बीड, नाट्यशास्त्र विभाग तर्फे डॉ. दीपाताई क्षीरसागर यांच्या प्रोत्साहनाने सादर झालेली द लास्ट बॅटल ह्या एकांकिकेची 'मुंबई येथे होणाऱ्या अंतिम फेरीसाठी' निवड झालेली आहे. या एकांकिकेला डॉ. दुष्यंता रामटेके यांचे मार्गदर्शन लाभले असून; त्यांच्या संशोधक विद्यार्थ्यांनी हि एकांकिका सादर केली होती. संदीप पाटील लिखित या एकांकिकेचे दिग्दर्शन बाळू बटुळे, संगीत- पांडुरंग शिनगारे, रंगभूषा आणि वेशभूषा - कविता दिवेकर, संगिता बनकर नेपथ्य- केशव पाटील सौरभ मोरे, प्रकाशयोजना - बाळू बटुळे, डॉ. दुष्यंता यांनी



केले असून साधना विटोरे, श्रुती गायकवाड,कनिष्क बनसोडे,भागेश दाभाडे,सुमित सोळुंके,एजाज सय्यद, स्वप्नील आव्हाड, आकाश गुंजाळ, आणि अशोक मगर इ. कलावंतांनी अभिनय केला. एकांकिकेचे उत्कृष्ट आणि दर्जेदार सादरीकरण झाले. प्राथमिक फेरीमध्ये छत्रपती संभाजीनगर,बीड, माजलगाव, शिरसाळा येथील संघ सहभागी झाले होते, त्यामधून सौ. के. एस. के. महाविद्यालय, बीड नाट्यशास्त्र विभागाची द लास्ट बॅटल ह्या एकांकिकेची, बीड केंद्रातून अंतिम फेरीसाठी निवड झाली . या यशाबद्दल मार्गदर्शक डॉ. दुष्यंता रामटेके आणि त्यांचे संशोधक विद्यार्थी बाळू बटुळे, पांडुरंग शिनगारे, कविता दिवेकर, संगीता बनकर व सहभागी कलावंतांचे , नाट्य परिषदेच्या अध्यक्ष तथा संस्थेच्या सहसचिव डॉ दीपाताई क्षीरसागर, संस्थेचे सचिव डॉ योगेश क्षीरसागर, संस्थेच्या सदस्य डॉ. सारिकताई क्षीरसागर, प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील , संस्थेचे प्रशासकीय अधिकारी. डॉ.व्ही.टी देशमाने, डॉ. सुधाकर गुट्टे, डॉ. सिद्धार्थ जाधव, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ काकडे, पर्यवेक्षक डॉ. कोळेकर , प्रा. विजयकुमार राख, डॉ. असलम शेख आणि महाविद्यालया तर्फे अभिनंदन करण्यात आले आणि अंतिम फेरीसाठी शुभेच्छा दिल्या.

# ठेवीदारांच्या ठेवी परत करण्या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांचा आढावा

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र ठेविदारांच्या (वित्तीय संस्थामधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ (एमपीआयडी क्ट १९९९) अन्वये ठेवीदारांच्या ठेवी परत करण्याच्या कार्यवाहीचा आढावा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात घेण्यात आला .या बैठकीस पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक एस.एस. शेजाळ, गुन्हे अन्वेषण विभाग (उखऊ) छत्रपती संभाजीनगरचे पोलीस



अधीक्षक यशवंत काळे, सहजिल्हा निबंधक एस.एम. शेख, विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था लातूर विभागचे फडणवीस सर, सक्षम प्राधिकारी गौरव इंगोले, जिल्हा उपनिबंधक सतीश तोतावार, जिल्हा सरकारी वकील धनंजय वाकनकर, तसेच विविध वित्तीय संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

या वेळी जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी एमपीआयडी प्रकरणातील कामकाज गतीने करण्यासाठी जिल्हा मुख्य न्यायाधीशांना पत्र देवून सर्व कोर्टांची बैठक घेण्याची विनंती केली जाणार असल्याचे सांगितले. अधिसूचना प्रसिद्ध न झालेल्या प्रकरणांबाबत अपर मुख्य सचिव (गृह) यांना पत्र देवून अधिसूचना प्रसिद्ध करण्यासह सक्षम प्राधिकारी नेमण्याची मागणी केली जाणार आहे. मालमत्तांच्या मुल्यांकनासाठी नोंदणी महानिरीक्षक आणि मुद्रांक नियंत्रक यांच्याकडे नोडल अधिकारी नेमण्याची विनंतीही करण्यात आली आहे. सर्व अवसायकांना त्यांच्या कार्यपद्धती निश्चित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या विषयावर पुढील आढावा बैठक एक महिन्यानंतर घेण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिली.

# बीडमध्ये वामनदादा कर्डक राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा उत्साहात साजरा

## नालंदा फाउंडेशन, बीड यांच्या वतीने 'भीमकोकिळा' सुषमादेवी यांचा महाकवी वामनदादा कर्डक राज्यस्तरीय पुरस्काराने गौरव

**बीड । प्रतिनिधी**

नालंदा फाउंडेशन, बीड यांच्या वतीने महाकवी वामनदादा कर्डक जयंतीनिमित्त आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा व भीमवाणी, वामन गाणी हा कार्यक्रम गुरुवार दि.२८ ऑगस्ट रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे मोठ्या उत्साहात पार पडला.या राज्यस्तरीय गौरवाचे चौथे वर्ष असून, यावर्षीचा पुरस्कार प्रख्यात भीमगीत गायिका 'भीमकोकिळा' सुषमादेवी मोटघरे यांना प्रदान करण्यात आला. नालंदा फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे यांच्या हस्ते सुषमादेवी यांना रु.२५,००० रोख, सन्मानपत्र आणि स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी प्रा.डॉ.मनोहर शिरसाट यांनी त्यांच्या जीवनकार्याचा गौरव करणारे मानपत्र वाचून दाखवले.

समारंभास सहाय्यक संचालक डी.बी.क्षीरसागर, सत्यशोधक ओबीसी परिषदेचे राज्याध्यक्ष संदीप उपरे, प्रा.दीपक जमदाडे, आयु.गुलाबराव भोले, कॅप्टन राजाभाऊ आठवले आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी आंबेडकरी चळवळीतील मान्यवर गायक आयु. धोंडीराम रोडे, आयु.छायाबाई कोकाटे



आणि आयु.बळीराम उपाडे यांचाही स्मुर्तिचिन्ह व मानपत्र देऊन विशेष सन्मान करण्यात आला.

अध्यक्षीय भाषणात प्रा. प्रदीप रोडे म्हणाले, फुले-शाहू-आंबेडकरांचा विचार गीतातून जपणाऱ्या 'भीमकोकिळा' सुषमादेवींचा सन्मान हा समाजप्रबोधनाचा गौरव आहे. कलाकारांनी शरीराची तमा न बाळगता प्रबोधनाची वाट चालवली असून त्यांचे योगदान विसरता येणार नाही, असे नमूद केले. तर प्रमुख अतिथी डी.बी.क्षीरसागर यांनी सर्व सत्कारमूर्तींचे अभिनंदन करत प्रा.प्रदीप रोडे यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले. विविध जयंती व सामाजिक कार्यक्रमांतून ते समाजाला एकत्र आणण्याचे कार्य करीत आहेत, असे त्यांनी अधोरेखित केले.सांस्कृतिक कार्यक्रमात विविध कलावंतांनी वामनदादा कर्डक यांच्या जाज्वल्य विचारांना आपल्या गाण्यांतून उजाळा दिला. विशेषतः सुषमादेवींच्या दमदार आणि भावस्पर्शी सादरीकरणाने उपस्थित प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले.कार्यक्रमाचे संयोजन प्रा.शरद वंजारे, प्रा.राम गायकवाड, प्रा.डॉ.संजय कांबळे, सिद्धार्थ वाघमारे यांच्यासह महाकवी वामनदादा कर्डक जयंती उत्सव समिती, बीड यांनी केले. प्रास्ताविक प्रा. शरद वंजारे यांनी केले, सूत्रसंचालन प्रा.आकाश जाधव यांनी तर आभारप्रदर्शन प्रा.राम गायकवाड यांनी मानले. समारंभास बीड शहर व परिसरातील नागरिक, समाजप्रेमी व सांस्कृतिक रसिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.


# केज येथील वक्रतुंड गणेश मंडळाच्या वतीने काशीद वाडी येथे वड, पिंपळ,उंबराच्या सीड बॉलचे रोपण

**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील प्रशांत नगर भागात असणारा वक्रतुंड गणेश मंडळ हा गेली सोळावर्षे आपल्या विविध कार्यक्रमातून सामाजिक सलोखा जपत आहे तसेच नैसर्गिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. सातत्याने वक्रतुंड गणेश मंडळाच्या वतीने समाज उपयोगी उपक्रम राबवले आहेत.शुक्रवार दिनांक २९ आगष्ट रोजी वक्रतुंड गणेश मंडळा च्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करून पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून वृक्षारोपण करण्यासाठी काशीदवाडी येथील डोंगरात २०० सीडबॉल चे रोपण करण्यात आले.या सीडबॉलच्या माध्यमातून वड,पिंपळ उंबर आदी पर्यावरण पूरक वृक्षांची लागवड केली गेली.यावेळी काशीदवाडी चे सरपंच महादेव जाधवर हे उपस्थित होते.या सीड बॉल च्या माध्यमातून वातावरणात ऑक्सिजनची निर्मिती करणारे व भारतभूमी तील नैसर्गिक झाडे लावण्याचा हा प्रयत्न वक्रतुंड गणेश मंडळा च्या वतीने करण्यात आला.यावेळी बोलताना पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांनी सांगितले की डॉल्बी ही आपली संस्कृती नाही. त्यामुळे गणपती उत्सवात डॉल्बी वगैरे लावू नये तसेच आपली संस्कृती जपत सामाजिक बांधिलकी जपत आपला सांस्कृतिक वारसा जपला पाहिजे याचा फायदा आपल्या भागातील नागरिकांना यांचा लाभ झाला पाहिजे चांगली विचार सरणी जोपासली पाहिजे.शारीरिक, मानसिक आरोग्य जोपासले पाहिजे यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांना अभिप्रेत असणारे कार्य झाले आपल्या हातून झाले पाहिजे असे सांगितले.काशीदवाडीचे सरपंच महादेव जाधव यांनी वक्रतुंड गणेश मंडळ यांनी अतिशय चांगला उपक्रम राबवला असून लवकरच हे झाडे जोपासण्याचे काम झाल्यावर नैसर्गिक समतोल राखला जाईल आणि यासाठी आमचे गाव निवडल्या बद्दल वक्रतुंड गणेश मंडळाचे आभार मानले यावेळी प्रशांत नगर भागातील वक्रतुंड गणेश मंडळाचे सर्व युवा वर्ग उपस्थित होता.



# आ.डॉ.विजयकुमार गावित यांच्या कडून रांगोळी कलाकारांचे कौतुक



**नंदुरबार । दिपक गोसावी**

शहरातील मध्यवर्ती गणेश पेठ मंदिरात साई आर्ट इन्स्टिट्यूटच्या कलाकारांनी साकारलेल्या भव्य रांगोळीचे उद्घाटन नुकतेच मा. मंत्री तथा आमदार डॉ. विजयकुमार गावित यांच्या हस्ते झाले. मुंबईतील 'फोर्टच्या राजाची' प्रतिकृती असलेली ही आकर्षक रांगोळी पाहण्यासाठी गणेश भक्तांनी मोठी गर्दी केली होती.

गेले तब्बल ४८ तास अथक परिश्रम घेऊन साई आर्ट इन्स्टिट्यूटच्या कलाकारांनी ही कलाकृती साकारली. या कलेचे आणि कलाकारांच्या मेहनतीचे कौतुक करताना डॉ. विजयकुमार गावित यांनी गौरव माळी आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे तोंडभरून कौतुक केले आणि त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली.

यावेळी महादू हिरणवाळे, महाराष्ट्र कर्मचारी महासंघाचे प्रदेश रणजीतसिंग राजपूत, माजी उपनगराध्यक्ष श्याम मराठे, लक्ष्मण माळी, आकाश चौधरी, आणि संतोष वसईकर आदी मान्यवर उपस्थित होते. या रांगोळीमुळे गणेशोत्सव काळात मंदिराची शोभा आणखी वाढली असून, ती सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे.

# गृह रक्षक दलाचे सुनील कुलकर्णी यांची सार्जंट पदावर बढती



**केज । प्रतिनिधी**

गृह रक्षक दलाचे जवान सुनील कुलकर्णी यांना सार्जंट पदावर बढती मिळाली आहे.केज येथे गृह रक्षक दलात निष्काम सेवा बजावत असलेले गृह रक्षक दलाचे जवान सुनील कुलकर्णी यांची सार्जंट पदावर बढती मिळाली आहे. यावेळी त्यांना केज पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप मांजरमे, तालुका तालुका समादेशक दिनकर राऊत यांनी त्यांना फीत लावून त्यांचे अभिनंदन केले.तसेच यावेळी विकास मस्के, शिवदास आवाड, शेप, थोरात, महाजन, नजमा, भांगे हे उपस्थित होते या सर्वांनी त्यांचे अभिनंदन करून कौतुक केले आहे.

# नगर रेल्वेची चाचणी घेण्यात येऊ नये–गणेश शिंदे



**बीड । प्रतिनिधी**

बीड नगर रेल्वे मार्ग जवळपास पूर्ण झाला असून दिनांक १७ सप्टेंबर २५ रोजी त्याची चाचणी होणार आहे. सदरील निरमानाधीन रेल्वे ट्रॅकच्या निर्मितीमुळे नागरिकांना मार्गाची व्यवस्था करण्यात आली आहे परंतु बीड रेल्वे स्टेशन परिसरात असलेल्या भुयारी मार्गातून पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात झिरपत आहे. पुलाच्या ठिकाणीच खूप मोठ्या प्रमाणात जमा साचत आहे. सदरील पुलाचे काम हे निकृष्ट दर्जाचे झाले असून नागरिकांना त्याचा त्रास होऊन दुर्घटना होण्याची शक्यता आहे. या निवेदनाद्वारे पत्रकार गणेश शिंदे यांनी केली आहे.

# शांतता कमिटीच्या बैठकीत विविध विषयांवर चर्चा

**मोलगी । रविंद्र वळवी**

धडगाव येथील तहसीलदार कार्यालयात शांतता कमिटीची बैठकीत गणेशोत्सव शांततेत पार पाडण्यासाठी विभागीय समन्वयावर भर देण्यात आला.

बैठकीत नगराध्यक्ष धनसिंग पावरा, माजी जिल्हा परिषद सदस्य रूपसिंग तडवी,माजी उपसभापती भाईदास अत्रे, नायब तहसीलदार किसन गावित, पोलिस निरीक्षक राजेंद्र जगताप, विद्युत वितरण विभागाचे अभियंता जगदीश पावरा, बांधकाम विभागाचे विशाल पावरा, नगरपंचायतचे मुख्याधिकारी रमेश बहिरम, वैद्यकीय अधीक्षक डॉ.बाबुलाल पावरा, राकेश पावरा, अशोक शिंदे, दीपक शिवदे,सचिन जळोदकर, ऋषिकेश सोनवणे, सागर निकवाडे,माजी जिल्हा परिषद सदस्य हारसिंग पावरा ,शैलेश पावरा, राजेंद्र पावरा ,इंजि.प्रविण पावरा यांच्यासह विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी उपस्थित होते.



बैठकीत शहरातील साफसफाई, अतिक्रमण हटविणे, गणेशोत्सव काळातील शिस्त व सुरक्षाव्यवस्था या विषयांवर चर्चा झाली. विजय पराडके यांनी गणेशोत्सव काळात शहरात भांडणे अथवा वाद होऊ नये, यासाठी पोलिस प्रशासनाने लक्ष द्यावे, अशी सूचना केली. विद्युत वितरण विभागाचे अभियंता जगदीश पावरा यांनी नागरिकांना अधिकृत वीज कनेक्शन घेण्याचे आवाहन केले. बांधकाम विभागाचे विशाल पावरा यांनी नगरपंचायत प्रशासनाला रस्त्यांवरील खड्डे बुजवणे व अतिक्रमणावर कारवाई करण्याचे सुचना मांडली. डॉ.बाबुलाल पावरा यांनी उत्सव काळात आरोग्य सुविधा व रुग्णवाहिका सज्ज ठेवण्याचे आश्वासन दिले. बैठकीत सर्व विभागांच्या समन्वयातून गणेशोत्सव शांततेत, सुरक्षिततेत आणि उत्साहात पार पाडण्याचा ठराव घेण्यात आला.

# खासदार रविन्द्र चव्हाण यांचा कुटूंब पुरग्रस्ताच्या मदतीसाठी रस्त्यावर

**नायगांव । हानुमंत चंदनकर**

काल झालेल्या संततधार पाऊस व अतिवृष्टीमुळे अतोनात नुकसान झालेल्या पुरग्रस्ताच्या मदतीसाठी नांदेड जिल्ह्याचे खासदार रविन्द्र पा. चव्हाण यांच्यासह त्यांचा कुटूंब पुरग्रस्तांना धीर देण्यासाठी रस्त्यावर आला होता यामुळे संकटासमयी पुरग्रस्ताच्या मदतीसाठी चव्हाण कुंटूंब धावून आल्यामुळे नागरिकातुन समाधान यक्त करण्यात येत आहे.

खासदार रविन्द्र चव्हाण हे पुरग्रस्तभागाची पाहणी करत जिल्हाधिकारी यांना तातडीची कार्यवाही करून पंचनामे करण्याचे सुचना दिले तर कालपासून सतत झालेल्या अतिवृष्टी व पुराच्या पाण्यामुळे शेतीचे नुकसान झालेल्या शेतकर्यांच्या थेट बांधावर जावून शेतकर्यांना धीर देत आर्थिक मदत मिळवून देण्याचे आश्वासन देत आहेत तर



नायगाव शहरात अनेक घरात पाणी शिरल्याने अनेकांचे संसार उघड्यावर पडले यामुळे त्यांना धीर देण्यासाठी व आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी नायगाव तंटामुक्ती अध्यक्ष हनमतराव पा.चव्हाण, उपनगराध्यक्ष विजय पा.चव्हाण,खरेदी विक्री संघांचे चेयरमन श्रीनिवास पा.चव्हाण, नगरसेवक तथा युवा नेते पंकज पा.चव्हाण,विराज पा.चव्हाण यासह चव्हाण परिवारांचे सर्व सदस्य पुर परिस्थितीचा आढावा घेऊन धीर दिला यावेळी पुरग्रस्तांना चव्हाण कुंटूंबीयाच्या वतीने खिचडीचे वाटप करण्यात आले.

# उरण तालुक्यातील तरुणांचा शिवसेनेत पक्ष प्रवेश



**उरण । प्रतिनिधी**

गोरगरिबांच्या कल्याणासाठी शिवसेना पक्ष रात्रं दिवस कार्यरत असून पक्षाने गोरगरिबांना मोठया प्रमाणात आधार दिला आहे. शिवसेनेचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांनी अनेक लोक कल्याण कारी निर्णय घेतले आहेत. त्यामुळे जन माणसात शिवसेनेची प्रतिमा उंचावली आहे. शिवसेनेप्रती लोकांचा आदर मोठया प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे आज प्रत्येकजण शिवसेनेकडे आकर्षित होत आहेत. अनेक जण मोठया प्रमाणात पक्ष प्रवेश देखील करत आहेत.शिवसेना पक्षाचे मुख्य नेते महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांच्या कार्याप्रणालीवर विश्वास ठेवून उरण मधील तरुणांनी शिवसेनेत पक्ष प्रवेश केला.मावळचे लाडके खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या हस्ते पनवेल मधील जनसंपर्क कार्यालयात उरण विधानसभेतील कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश करण्यात आला.रोहित बाळासाहेब मस्के राहणार नागाव म्हातवली,प्रणय प्रमोद वाघमारे राहणार द्रोणागिरी,मयूर दत्ता पाटील राहणार द्रोणागिरी,गणेश महादेव भिरजदार राहणार केगाव,अनिल निमंग्रे राहणार मुळेखंड यांनी नुकताच शिवसेनेत पक्ष प्रवेश केला.या प्रसंगी विधानसभा संपर्क प्रमुख रमेश म्हात्रे तसेच उरण तालूका प्रमुख दिपक ठाकूर, उरण तालूका ग्राहक संरक्षण कक्ष वीरू चाळके,भावेश भोईर व उपशाखाप्रमुख उपस्थित होते.तरुण वर्ग मोठया प्रमाणात शिवसेनेत पक्ष प्रवेश करीत असून यामुळे शिवसेना पक्ष अधिक मजबूत, व्यापक होण्यास मदत होत आहे. पक्ष प्रवेश मुळे संघटना व पक्षाचे आचार विचारतळागाळात पोहोचण्यास मदत होणार आहे.

# राजुरा मतदारसंघातील विविध प्रश्नांवर मुख्यमंत्री व मंत्र्यांकडे आमदार देवराव भोंगळे यांचा पाठपुरावा

**मुंबई । प्रतिनिधी**

राजुरा विधानसभा मतदारसंघातील विकासात्मक व जनहिताचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी आमदार देवराव भोंगळे यांनी मुंबई मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक मंत्र्यांची भेट घेतली. कॅबिनेट बैठकीच्या निमित्ताने झालेल्या या चर्चेत मतदारसंघातील महत्त्वाच्या मागण्या त्यांनी मांडल्या.आमदार भोंगळे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना अलीकडेच विरूर स्टेशन येथे झालेल्या महाआरोग्य शिबिराची तसेच राजुरा, गोंडपिपरी, कोरपना, गडचांदूर, जिवती व नांदा येथे आमचा देवाभाऊ रक्षाबंधन सोहळ्याचा अहवाल सादर केला. यावेळी गोंडपिपरी तालुक्यातील एमआयडीसीअंतर्गत ४३०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसाठी झालेल्या सामंजस्य कराराबद्दल त्यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले.गोंडपिपरी ग्रामीण रुग्णालयाच्या बांधकामाला हायपावर कमिटीची मान्यता मिळावी, तसेच राजुरा शहरातील मुख्य मार्गावरील परवानगीशिवाय तोडण्यात




आलेल्या जांभळी व चिचवा या झाडांप्रकरणी कारवाई व्हावी, अशी मागणी त्यांनी केली. याचबरोबर, राजुरा-चुनाळा-धानोरा-अंतरगाव-अन्नुर या महत्त्वाच्या रस्त्याची दुरवस्था लक्षात घेऊन एडीबी अंतर्गत तातडीने निधी मंजूर करावा, अशी विनंतीही त्यांनी केली.राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे जिवती तालुक्यातील वनजमीन पट्ट्यांचा प्रश्न, सिमावर्ती १४ गावांचा प्रश्न, राजुरा शहरातील देशपांडेवाडीतील वर्ग २ प्रकरण तसेच जिवती तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी अग्रिस्टाक आयडीसंदर्भात शिथिलता देण्याची मागणी त्यांनी केली. कृषीमंत्री दत्तात्रय भरणे व पणनमंत्री जयकुमार रावल यांच्याशी झालेल्या चर्चेत शेतकऱ्यांना संगणकीकृत सातबारा नोंदी नसल्याने हस्तलिखित सातबाऱ्यावरच कपास किसान अप्लिकेशन वर नोंदणी करण्याची परवानगी द्यावी अशी मागणी करण्यात आली.तसेच, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांची भेट घेऊन जिवती ग्रामीण रुग्णालयाच्या ३० खाटांच्या पहिल्या मजल्याच्या बांधकामासाठी अंदाजपत्र कालाप्रशासकीय मान्यता मिळावी, अशी मागणी आमदार भोंगळे यांनी केली. या सर्व विषयांवर मुख्यमंत्री आणि संबंधित मंत्र्यांनी सकारात्मक आश्वासन दिल्याने मतदारसंघातील प्रश्न मार्गी लागतील, असा विश्वास आमदार देवराव भोंगळे यांनी व्यक्त केला.

# साबला ग्रामपंचायत व सर्व ग्रामस्थ यांच्या वतीने ओम नाईकनवरे यांचा सत्कार सोहळा संपन्न

**केज । प्रतिनिधी**


तालुक्यातील मौजे साबला येथील ओम अभिमान नाईकनवरे यांची जिल्हा परिषद बीड.आरोग्य सेवक म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचा ग्रामपंचायत कार्यालय ,साबला तसेच साबला नगरीतील सर्व ग्रामस्थांच्या वतीने ओम अभिमान नाईकनवरे यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता .या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच जनाबाई नरहरी काकडे तसेच प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच कचराबाई राजेंद्र सरवदे , माजी सरपंच मधुकरराव काकडे , माननीय लहूराव राऊत महिला व बालविकास संरक्षण अधिकारी , श्रीमती चंद्रभागा अभिमान नाईकनवरे अंगणवाडी सुपरवायझर यांच्या शुभ हस्ते सत्कार करण्यात आला व पुढील कार्याला शुभेच्छा देण्यात आल्या . सत्कार समारंभ प्रसंगी ओम नाईकनवरे यांनी आपल्या मनोगतातून प्रथम सर्व उपस्थितांचे आभार मानले . आणि या माझ्या यशात प्रथम माझे आईवडील , तसेच माझी मोठी बहिण चंद्रभागा राऊत व मेहुणे लहूराव राऊत तसेच माझे सर्व कुटुंबीय सुध्दा आहेत . सत्कार प्रसंगी भावुक होऊन ओम नाईकनवरे यांनी असे म्हटले . की पुढील सेवेच्या कार्यकालात सर्वांची सेवा ही माझ्या कुटुंबातील सदस्य आहेत . असं समजून त्यांची सेवा करण्याची अशी ग्वाही त्यांनी दिली . यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच जनाबाई काकडे यांनी असे म्हटले की ओम नाईकनवरे यांची परिस्थिती ही सर्वसाधारण कुटुंबातील असून आई आणि वडिल हे शेतात काबाड कष्ट करतात . शेतीही जास्त नाही . शेतीतील उत्पन्न ही पावसावर अवलंबून आहे . मग आपण अभ्यास नाही केला तर आपले काय होईल . याचा विचार करून ओम नाईकनवरे यांनी चांगले यश मिळविले याबद्दल सरपंच जनाबाई काकडे यांनी ओम नाईकनवरे यांचे अभिनंदन केले . व पुढील कार्याला शुभेच्छा दिल्या . माजी सरपंच मधुकरराव काकडे ,उमाशंकरराव शिंदे माजी पोलिस उपनिरीक्षक, आदर्श शिक्षक विक्रमराव नाकईनवरे, लहूराव राऊत ,चंद्रभागा राऊत यांनीही ओम नाईकनवरे यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या .या कार्यक्रमासाठी साबला नगरीतील सर्व लहान थोर वडिल धारी मंडळी उपस्थित होती .या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदर्श शिक्षक सुधीर नाईकनवरे यांनी केले . तर आभार प्रदर्शन माजी उपसरपंच अभिमान नाईकनवरे यांनी मानले .



# श्रीगणेशा आरोग्य अभियान-२०२५ तळोदा येथे मोफत वैद्यकीय शिबिर

**नंदुरबार । दिपक गोसावी**

महाराष्ट्र राज्य मुख्यमंत्री सहाय्यता निधी, धर्मदाय रुग्णालय मदत कक्ष, आणि सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने तळोदा येथे श्रीगणेशा आरोग्य अभियान-२०२५ अंतर्गत एक मोफत आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले आहे. आमदार राजेश पाडवी यांचे कै. कलावती फाउंडेशन आणि उपजिल्हा रुग्णालय, तळोदा यांच्या सहकार्याने हे शिबिर २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर या कालावधीत शनिगली येथील बडा दादा गणेश मंडळात सुरू आहे. या शिबिरामध्ये आतापर्यंत ५० हून अधिक रुग्णांची तपासणी करण्यात आली आहे.




या उपक्रमाचा मुख्य उद्देश सर्वसामान्य जनतेला विनामूल्य व दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे आहे. शिबिरात जनरल मेडिसिन, जनरल सर्जरी, अस्थिरोग, बालरोग, हृदयरोग, नेत्रविकार, त्वचारोग, दंतरोग व कर्करोग यांसारख्या विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ डॉक्टर तपासणी व मार्गदर्शन करत आहेत. यासोबतच, आवश्यक त्या शस्त्रक्रिया, रक्त व लघवीच्या चाचण्या तसेच ईसीजी तपासण्या पूर्णपणे मोफत केल्या जात आहेत. हे आरोग्य शिबिर विशेषतः तळोदा तालुक्यातील तसेच नंदुरबार जिल्ह्यातील ग्रामीण व आदिवासी रुग्णांसाठी मोठा दिलासा ठरत आहे. महागड्या उपचारांसाठी मोठ्या शहरांकडे धाव घेण्याची वेळ आता टळली असून, आरोग्य सेवा स्थानिक पातळीवरच उपलब्ध होत आहे.आयोजकांनी व्यक्त केले की, श्रीगणेशा आरोग्य अभियान-२०२५ हे केवळ आरोग्यसेवेचे नाही, तर सामाजिक आरोग्य संवर्धनाचे अभियान ठरणार आहे. शिबिराच्या यशस्वीतेसाठी डॉ. राजेश वसावे, डॉ. ओंकार वळवी, डॉ. दिनेश पावरा, जितेंद्र तडवी यांच्यासह कै. कलावती फाउंडेशनचे योगेश मराठे, मुकेश बिरारे, अण्णा पाटील, प्रवीण महाले, आणि रोहन गुरव यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत.

# दिव्यात दातीवली तलावात दीड दिवसाच्या गणरायाला निरोप

**ठाणे** । प्रतिनिधी

दिवा शहरातील दातीवली तलाव येथे 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' या जयघोषात दीड दिवसांच्या घरगुती गणपती बाप्पाला भावपुर्ण वातावरणात निरोप देण्यात आला. दीड दिवसांच्या बाप्पाचे आज जयघोषात विसर्जन करण्यात आले. दरम्यान आज दुपारनंतर गणपती विसर्जनाचा मुहूर्त होता. त्यामुळे आज संपूर्ण राज्यभरासह गणेशोत्सव प्रसिद्ध असणाऱ्या दिव्यात देखील दीड दिवसांच्या गणपती बाप्पाचे विसर्जन करण्यात आले आहे. दिवस भर पावसात गणपती बाप्पाचे विसर्जन करण्यात आले. दरम्यान ठाणे जिल्ह्यात जवळपास हजारो गणपतींचे आज विसर्जन करण्यात आले. संपूर्ण राज्यभरात आज दीड दिवसांच्या गणपती बाप्पाचे मोठ्या जयघोषात, जड अंतःकरणाने विसर्जन करण्यात आले. यावेळी मुंब्रा पोलीस स्टेशन अंतर्गत दिवा पोलिसांचा चोख बंदोबस्त तसेच ठाणे महापालिकेचे कर्मचारी, सफाई कामगार, होमगार्ड, पोलिस मित्र, आपत्ती



विभागाचे कर्मचारी, अग्निशमक दलाचे जवान आदी उपस्थित होते. यावेळी रात्री १२ पर्यंत शेकडो घरगुती गणेश मुर्त्यांचे विसर्जन करण्यात आले.

# राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त केज तालुक्यातील विनोद गुंड यांचा गौरव




**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून बीड जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. या सोहळ्यात क्रीडा संघटक, प्रशिक्षक व क्रीडा संयोजक म्हणून उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या केज तालुक्यातील विनोद गुंड यांचा विशेष सन्मान करण्यात आला. दिनांक २९ ऑगस्ट २०२५ रोजी राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त बीडचे जिल्हाधिकारी श्री. विवेक जॉन्सन साहेब यांच्या हस्ते विनोद गुंड यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या वेळी बीड जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. अरविंद विद्यागर साहेब, प्रा. जनार्दन शेळके सर आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच जिल्ह्यातील विविध खेळाडू, क्रीडा संघटक आणि क्रीडा प्रेमींची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. या कार्यक्रमातून क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेऊन खेळाडू आणि प्रशिक्षकांना प्रोत्साहन मिळाल्याचे समाधान उपस्थितांनी व्यक्त केले.

# शहीद शिरीषकुमार मित्र मंडळातर्फे यंदाही पर्यावरणपूरक गणेशोत्सव

**नंदुरबार । प्रतिनिधी**

शहरातील बालवीर चौक, महात्मा बसवेश्वर नगर भागातील शहीद शिरीषकुमार मित्र मंडळातर्फे यंदाही पर्यावरणपूरक शाळू मातीची मूर्ती स्थापित करून गणेशोत्सव साजरा करण्यात येत आहे. यंदा पुणे येथील दगडूशेठ हलवाई गणपतीची प्रतिकृती बनविण्यात आली आहे.

पर्यावरणपूरक मूर्तीलगत टाकाऊ कपड्यांच्या सहाय्याने आकर्षक सजावट करण्यात आली आहे. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या गणेशोत्सव साजरा करण्याचे मंडळाचे यंदा ३७ वे वर्ष आहे. मंडळातर्फे गुलाल ऐवजी फुलांचा उपयोग तसेच डीजे,ढोल ताशा ऐवजी पारंपारिक टाळ मृदंगाचा वापर करण्यात येतो. याशिवाय रक्तगट तपासणी शिबिर,दंत तपासणी शिबिर, अवयव दान , नेत्रदान जनजागृती अभियान, चर्चासत्र, आरोग्य तपासणी शिबिर मोफत तुळशी रोपांचे वाटप, व्यसनमुक्तीपर एकपात्री प्रयोग, विद्यार्थ्यांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम चित्रकला स्पर्धा, नृत्य स्पर्धा, महिलांसाठी रांगोळी स्पर्धा, संगीत खुर्ची स्पर्धा,भजन, गीत गायन, आदी उपक्रमांचे आयोजन आहे. याचबरोबर निर्माल्य संकलनासाठी स्वतंत्र निर्माल्य कलश ठेवण्यात आला आहे. अनंत चतुर्दशीला कुठलीहि मिरवणूक न काढता परस्पर प्रकाशा तापी नदी पात्रात श्रींचे विसर्जन करण्यात येते. अशी माहिती मंडळाचे संस्थापक अध्यक्ष महादू हिरणवाळे यांनी दिली.



गुरुवारी सायंकाळी उपविभागीय पोलीस अधिकारी संजय महाजन,शहर पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, पो.का.गोपाल चौधरी यांच्या हस्ते आरती करण्यात आली. याप्रसंगी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष महादू हिरणवाळे, सल्लागार जी. एस. गवळी, बी.डी. गोसावी, कार्याध्यक्ष संभाजी हिरणवाळे, प्रा. एकनाथ हिरणवाळे, गोपाल हिरणवाळे, विशाल हिरणवाळे, यांच्या सह महिला, पुरुष भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ब्रह्माकुमारीज शहादा ओम शांती परिवारातर्फे रक्तदान शिबिरास दात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**शहादा । प्रतिनिधी**

प्रजापिता ब्रम्हाकुमारीज ईश्वरीय विश्व विद्यालय अर्थात ओम शांती परिवाराच्या मुख्य प्रशासिका दादी प्रकाशमणी यांच्या अठराव्या पुण्यस्मरण दिनानिमित्त ओम शांती परिवाराच्या समाज सेवा प्रभागातर्फे आयोजित भव्य रक्तदान महा शिबिरास दात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

आयोजित रक्तदान शिबिराचे उद्घाटन दीप प्रज्वलनाने करण्यात आले. तसेच मुख्य प्रशासिका दादी प्रकाशमणी यांच्या प्रतिमेस शहादा केंद्र संचालिका यांनी पुष्प अर्पण केले.प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय आणि जनकल्याण रक्त संकलन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिरात ५० पेक्षा अधिक प्रमाणावर दात्यांनी रक्तदान करून



सहभाग नोंदविला. शहादा केंद्राच्या संचालिका बीके विद्या दीदी यांनी सांगितले की, ब्रह्माकुमारीज सेवा व समाज विभागातर्फे आयोजित रक्तदान शिबिराची विश्व विक्रमात नोंद होणार आहे.उपस्थित होते. रक्तदान महाशिबीर यशस्वीतेसाठी प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या शहादा केंद्रातील ,साधक व भगिनींनी परिश्रम घेतले.

# बोरदच्या तरुणांचा अनोखा उपक्रम: बारा ज्योतिर्लिंगाचे दर्शन गावातच घडवून आणले

**नंदुरबार । दिपक गोसावी**

गणेशोत्सवादरम्यान दरवर्षी नवनवीन देखावे सादर केले जातात, पण बोरद येथील गौरी गणेश मंडळाने यंदा सादर केलेला बारा ज्योतिर्लिंगांचा देखावा केवळ मनोरंजनाचा भाग नसून तो सामाजिक बांधिलकीचे एक उत्तम उदाहरण ठरला आहे. मोलमजुरी करून पोटाची खळगी भरणारे या मंडळातील तरुण, स्वतःच्या पैशातून वर्गणी गोळा करून हा भव्य देखावा साकारत आहेत.आपल्या आयुष्यात एकदा तरी बारा ज्योतिर्लिंगांचे दर्शन घ्यावे, असे स्वप्न अनेक गरीब आणि वृद्ध नागरिक बाळगतात. परंतु, आर्थिक परिस्थितीमुळे आणि वाढत्या वयामुळे ते हे स्वप्न पूर्ण करू शकत नाहीत. गौरी गणेश मंडळाच्या तरुणांनी हीच बाब हेरून, अशा



लोकांसाठी त्यांच्या गावातच बारा ज्योतिर्लिंगाचा हुबेहूब देखावा साकारला आहे. या देखाव्याला परिसरातील नागरिकांचा, विशेषतः वृद्ध लोकांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे.

गौरी गणेश मंडळाचे वेगळेपण म्हणजे ते बाहेरील व्यक्तींकडून कोणतीही देणगी घेत नाहीत. मंडळाचे सदस्य स्वतःहून देणगी जमा करतात आणि त्यातूनच हा देखावा तयार करतात. ही गोष्ट या मंडळाला एक आदर्श ओळख मिळवून देते. 'आपण बारा ज्योतिर्लिंगाला जाऊ शकलो नाही, पण आमच्या तरुण मुलांनी हे स्वप्न इथेच पूर्ण केले', अशा भावना वृद्ध नागरिक व्यक्त करत आहेत. या उपक्रमातून मंडळाने 'जर मनात देव असेल, तर तो स्वतःहून चालत येतो', हेच सिद्ध केले आहे. बोरद गावातील या तरुणांनी सामाजिक जबाबदारीचे भान ठेवत, केवळ एक देखावाच सादर केला नाही, तर अनेक लोकांच्या मनात आनंदाची ज्योत पेटवली आहे. त्यांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077